# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## रास पंचाध्याय(10.31)गोपी गीत



प्रेम का रस बिछोह की पाती

गोपी गीत अमृत की भांति

नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।

देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।

प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

श्रीमद्भागवतमहापुराणम्

दशमः स्कंधः

अथैकत्रिंशोऽध्यायः

गोप्य ऊचुः

जयति तेऽधिकं(ञ्) जन्मना व्रजः(श्),

श्रयत इन्दिरा शश्वदत्र हि ।

दयित दृश्यतां(न्) दिक्षु तावकास्-

त्वयि धृतासवस्त्वां(वँ) विचिन्वते ॥ 1॥

धृता+ सवस्+ त्वां(वँ)

प्रियतमा! तुमच्या जन्मामुळे व्रजाचा महिमा अधिक वाढला आहे. म्हणूनच तर लक्ष्मी कायमची येथे येऊन राहिली आहे; प्रियतमा पहा! ज्यांनी तुमच्यासाठीच आपले प्राण धारण केले आहेत, त्या गोपी दिशादिशांमध्ये तुम्हाला शोधीत आहेत. ॥ 1॥

शरदुदाशये साधुजातसत्,

सरसिजोदर*श्रीमुषा दृशा ।

सुरतनाथ तेऽशु*ल्कदासिका,

वरद नि*घ्नतो नेह किं(वँ) वधः ॥ 2॥

सरसि+ जोदर+ श्रीमुषा

हे प्रेम पूर्ण हृदयाचे स्वामी! आम्ही वेतन न घेणाऱ्या तुमच्या दासी आहोत. शरत्कालीन जलाशयामधील सुंदर अशा कमळांच्या गाभ्यातील सौंदर्याला तुच्छ ठरवणाऱ्या नेत्रांनी तुम्ही आम्हांला घायाळ केले आहे. आमचे मनोरथ पूर्ण करणारे हे प्राणेश्वर! नेत्रांनी मारणे हा वध नाही काय? ॥ 2॥

विषजलाप्ययाद् व्यालराक्षसाद्,

वर्षमारुताद् वैद्युतानलात् ।

वृषमयात्मजाद् वि*श्वतोभया-

दृषभ ते वयं(म्) *रक्षिता मुहुः ॥ 3॥

विष+ जलाप्ययाद् , व्याल+ राक्षसाद् , वर्ष+ मारुताद् , वैद्युता+ नलात् ,वृष+ मयात्मजाद्

हे पुरुषोत्तमा! यमुनेच्या विषारी पाण्यामुळे होणारा मृत्यू, अजगराच्या रूपाने खाणारा आघासुर, इंद्राने केलेला वर्षाव, तुफान, विजा, दावानल, वत्सासुर आणि व्योमासुर इत्यादींनी उत्पन्न केलेल्या सर्व प्रकारच्या भयांपासून तुम्ही वारंवार आमचे रक्षण केले आहे. ॥ 3॥

न खलु गोपिका*नन्दनो भवा-

नखिलदेहिना*मन्तरात्मदृक् ।

विखनसार्थितो वि*श्वगु*प्तये,

सख उदेयिवान् सात्वतां(ङ्) कुले ॥ 4॥

नखिल+ देहिना+ मन्त+ रात्मदृक्, विखन+ सार्थितो

तुम्ही केवळ यशोदा नंदनच नाही, तर सर्व प्राण्यांच्या अंतरांत राहणारे त्यांचे साक्षी आहात, हे सखया! ब्रह्मदेवांनी प्रार्थना केल्यामुळे विश्वाचे रक्षण करण्यासाठी तुम्ही यदुवंशात अवतीर्ण झाला आहात. ॥ 4॥

विरचिताभयं(वँ) *वृष्णिधुर्य ते,

चरणमीयुषां(म्) सं(म्)सृतेर्भयात् ।

करसरोरुहं(ङ्) कान्त कामदं(म्),

शिरसि धेहि नः(श्) श्रीकर*ग्रहम् ॥ 5॥

विरचिता + भयं, सं(म्)सृतेर् + भयात्

हे यदुवंशशिरोमणे! जे लोक जन्म-मृत्यूरूप संसाराच्या चक्राला घेऊन तुमच्या चरणांना शरण येतात, त्यांना निर्भय करणारे, सर्वांच्या अभिलाषा पूर्ण करणारे आणि लक्ष्मीचे पाणीग्रहण करणारे आपले करकमल, हे नाथ! आमच्या मस्तकावर ठेवा.॥ 5॥

व्रजजनार्तिहन् वीर योषितां(न्),

निजजनस्मयध्वं(म्)सनस्मित ।

भज सखे भवत्किं(ङ्)करीः(स्) स्म नो,

जलरुहाननं(ञ्) चारु दर्शय ॥ 6॥

व्रज+ जनार् + तिहन् , निज+ जनस्मय+ ध्वं(म्)सनस्मित

व्रजवासियांचे दुःख दूर करणारे हे वीरश्रेष्ठ! ज्यांच्या स्मिताने भक्तांचा गर्व मावळतो, अशा आमच्या प्रिय सख्या! या तुमच्या दासींचा स्वीकार करा. आपले सुंदर मुख कमळ आम्हा अबालांना दाखवा. ॥ 6॥

प्रणतदेहिनां(म्) पापकर्शनं(न्),

तृणचरानुगं(म्) श्रीनिकेतनम् ।

फणिफणार्पितं(न्) ते पदाम्बुजं(ङ्),

कृणु कुचेषु नः(ख्) कृन्धि हृच्छयम् ॥ 7॥

प्रणत+ देहिनां(म्) , तृण+ चरानुगं(म्) , फणि+ फणार्पितं(न्)

शरणागतांची पापे नाहीशी करणारे, गुरांच्या मागून जाणारे, लक्ष्मीची निवासस्थान, कालियाच्या फणांवर ठेवलेले असे तुमचे चरणकमल तुम्ही आमच्या वक्षः स्थळावर ठेवून आमच्या हृदयातील आग शांत करा.॥ 7॥

मधुरया गिरा वल्गुवाक्यया,

बुधमनोज्ञया पुष्करेक्षण ।

विधिकरीरिमा वीर मुह्यती-

रधरसीधुनाऽऽप्याययस्व नः ॥ 8॥

वल्गु+ वाक्यया , बुध+ मनोज्ञया , विधि+ करी+ रिमा , रधर+सीधुनाऽऽ+ प्याययस्व

हे कमलनयना! सुंदर सुंदर वाक्यांनी युक्त, विद्वानांनाही मोहविणाऱ्या तुमच्या गोड वाणीने या तुमच्या दासीही मोहित होत असतात. हे वीरा! आपल्या अधरामृताने आम्हाला तृप्त करा.॥ 8॥

तव कथामृतं(न्) तप्तजीवनं(ङ्),

कविभिरीडितं(ङ्) कल्मषापहम् ।

श्रवणमङ्गलं(म्) श्रीमदाततं(म्),

भुवि गृणन्ति ते भूरिदा जनाः ॥ 9॥

तप्त+ जीवनं(ङ्), कवि+ भिरीडितं(ङ्)

प्रभो! तुमच्या कथासुद्धा अमृतस्वरूपच आहेत. विरहाने व्याकुळ  झालेल्यांचे ते जीवन सर्वस्व आहे. ज्ञानी लोकांनी त्यांचे गायन केले आहे. त्या सगळे पाप- ताप मिटवून श्रवणानेसुद्धा कल्याण करतात. तुमच्या त्या सुंदर कथांचे जे विस्ताराने वर्णन करतात, तेच वास्तविक सर्वात मोठे दानशूर होत!॥ 9॥

**प्रहसितं(म्) प्रिय प्रेमवीक्षणं(वँ),**

**विहरणं(ञ्) च ते ध्यानमङ्गलम् ।**

**रहसि सं(वँ)विदो या हृदिस्पृशः(ख्),**

**कुहक नो मनः क्षोभयन्ति हि ॥ 10॥**

प्रेम+ वीक्षणं(वँ)

हे प्रियतमा! तुमचे प्रेम पूर्ण हास्य आणि कटाक्ष तसेच तुमच्या लीलांचे ध्यान हे सुद्धा अत्यंत मंगलदायक आहे. पण तुम्ही एकांतात ज्या हृदयस्पर्शी प्रेमाच्या गोष्टी केल्या, त्या आठवून हे कपटनाटकसूत्रधारा! आमच्या मनाची कालवा कालव होत आहे. ॥ 10॥

**चलसि यद् व्रजाच्चारयन् पशून्,**

**नलिनसुन्दरं(न्) नाथ ते पदम् ।**

**शिलतृणां(ङ्)कुरैः(स्) सीदतीति नः(ख्),**

**कलिलतां(म्) मनः(ख्) कान्त गच्छति ॥ 11॥**

व्रजाच् + चारयन् , शिल+ तृणां(ङ्)+ कुरैः(स्)

हे नाथ! गुरे चारण्यासाठी तुम्ही जेव्हा वाड्यातून बाहेर जाता, तेव्हा तुमच्या कमला पेक्षाही कोमल पायांना काटे- सराटे लागून ते दुःखद असतील, असा विचार मनात येतात हे मनमोहना! आम्हाला अतिशय दुःख होते. ॥ 11॥

**दिनपरिक्षये नीलकुन्तलैर्-**

**वनरुहाननं(म्) बिभ्रदावृतम् ।**

**घनरजस्वलं(न्) दर्शयन् मुहुर्-**

**मनसि नः(स्) स्मरं(वँ) वीर यच्छसि ॥ 12॥**

दिन+ परिक्षये , घन+रजस्+ वलं(न्)

दिवस मावळल्यानंतर जेव्हा तुम्ही वनातून घरी येता, तेव्हा तुमच्या मुखावर काळे कुरळे केस रुळत असतात. जणू भ्रमर युक्त कमळच. शिवाय गाईंच्या खुरांनी उडालेली दाट धूळही त्यावर पडलेली असते. हे वीरा! तुम्ही आपले ते सौंदर्य आम्हाला दाखवून आमच्या मनात वारंवार प्रेम उत्पन्न करीत असता. ॥ 12॥

**प्रणतकामदं(म्) पद्मजार्चितं(न्),**

**धरणिमण्डनं(न्) ध्येयमापदि ।**

**चरणपं(ङ्)कजं(म्) शन्तमं(ञ्) च ते,**

**रमण नः(स्) स्तनेष्वर्पयाधिहन् ॥ 13॥**

पद्म+ जार्चितं(न्) , स्तनेष्+ वर्प+ याधिहन्

हे प्रियतमा! तुमचे चरणकमल शरणागत भक्तांच्या सर्व इच्छा पूर्ण करणारे आहे. स्वतः लक्ष्मी त्यांची सेवा करते आणि पृथ्वीचे तर ते भूषणच आहे. संकटकाळी फक्त त्यांचेच चिंतन करणे योग्य आहे. आपले ते परम कल्याणस्वरूप चरण कमल आमच्या वक्षः स्थळावर ठेवून आमच्या हृदयाची व्यथा शांत करा.॥ 13॥

सुरतवर्धनं(म्) शोकनाशनं(म्),

स्वरितवेणुना सुष्ठु चुम्बितम् ।

इतररागविस्मारणं(न्) नृणां(वँ),

वितर वीर नस्तेऽधरामृतम् ॥ 14॥

सुरत+ वर्धनं(म्), स्वरित+ वेणुना, इतर+ रागविस् + मारणं(न्) नस् + तेऽधरा+ मृतम्

तुमचे अधरामृत प्रेम वाढविणारे असून सगळा शोक नाहीसा करणारे आहे. गाणारी ही बासरी चांगल्या तऱ्हेने त्यांचा आस्वाद घेते. ज्यांनी एक वेळ त्याचे पान केले, त्यांना पुन्हा प्रापंचिक विषयांची आठवणही होत नाही. हे वीरा! आपले तेच अधरामृत आम्हाला द्या.॥ 14॥

अटति यद् भवानह्नि काननं(न्),

त्रुटिर्युगायते त्वामपश्यताम् ।

कुटिलकुन्तलं(म्) श्रीमुखं(ञ्) च ते,

जड उदीक्षतां(म्) पक्ष्मकृद् दृशाम् ॥ 15॥

त्रुटिर् + युगायते , त्वाम+ पश्यताम्

हे प्रियतमा! दिवसा जेव्हा तुम्ही वनामध्ये विहार करण्यासाठी जाता, तेव्हा तुम्ही न दिसल्यामुळे आम्हाला एक एक क्षण युगासारखा वाटतो आणि जेव्हा तुम्ही संध्याकाळी माघारी येता, तेव्हा कुरळ्या केसांनी शोभणारे तुमचे सुंदर मुख आम्ही पाहू लागतो, त्यावेळी डोळ्यांच्या पापण्या बनवून दर्शनात व्यत्यय आणणारा हा विधाता मूर्ख आहे, असे आम्हाला वाटते.॥ 15॥

पतिसुतान्वयभ्रातृबान्धवा-

नतिविलङ्घ्य तेऽन्त्यच्युतागताः ।

गतिविदस्तवोद्गीतमोहिताः(ख्),

कितव योषितः(ख्) कस्त्यजेन्निशि ॥ 16॥

पतिसुतान्वय+ भ्रातृबान्धवा, तेऽन् + त्यच् + युतागताः

गति+ विदस्तवोद्+ गीतमोहिताः(ख्) , कस्त्य+ जेन्+ निशि

हे अच्युता! आम्ही आपले पति -पुत्र, बंधू बांधव आणि कुळाचा त्याग करून तुमच्याकडे आलो आहोत. आम्ही तुमची एक- एक क्रिया जाणतो, संकेत समजतो. तुमच्या मधुर गीताच्या मोहिनीने आम्ही येथे आलो आहोत, हे तुम्हाला माहित आहे. असे असताना हे कपटी! अशा रात्रीच्या वेळी आलेल्या अबलांना तुमच्या खेरीज आणखी कोण वाऱ्यावर सोडील!॥ 16॥

रहसि सं(वँ)विदं(म्) हृच्छयोदयं(म्),

प्रहसिताननं(म्) प्रेमवीक्षणम् ।

बृहदुरः(श्) श्रियो वीक्ष्य धाम ते,

मुहुरतिस्पृहा मुह्यते मनः ॥ 17॥

हृच्छ+ योदयं(म्), मुहुरति+ स्पृहा

एकांतात तुम्ही मिलनाची आकांक्षा, प्रेम भाव, जागृत करणाऱ्या गोष्टी करीत होतात. थट्टा- मस्करी करीत प्रेमपूर्ण दृष्टीने आमच्याकडे पाहत होतात आणि आम्ही लक्ष्मीचे निवासस्थान असणारे तुमचे विशाल वक्षःस्थळ पहात असू. तेव्हापासून आपल्या भेटीची आमची लालसा वाढत चालली असून आमचे मन त्याच विचारांनी मोहित होत आहे. ॥ 17॥

व्रजवनौकसां(वँ) व्यक्तिरङ्ग ते,

वृजिनहन्त्र्यलं(वँ) विश्वमङ्गलम् ।

त्यज मनाक् च नस्त्वत्स्पृहात्मनां(म्),

स्वजनहृद्रुजां(यँ) यन्निषूदनम् ॥ 18॥

व्रज+ वनौ+ कसां(वँ), वृजि+ नहन् + त्र्यलं(वँ)

नस् + त्वत् + स्पृहात् + मनां(म्) , यन् + निषूदनम्

हे प्रियतमा! तुमचे हे स्वरूप व्रजवनवासियांची सर्व दुःखे नाहीसे करणारे आणि विश्वाचे पूर्ण कल्याण करणारे आहे. आमच्या मनात फक्त तुमच्याविषयीच्याच लालसेने जी व्याधी उत्पन्न झाली आहे, तीवर असे काही थोडेसे औषध द्या की, जे तुमच्याच असलेल्या आमचा हृदयरोग समूळ नाहीसा करील. ॥ 18॥

यत्ते सुजातचरणाम्बुरुहं(म्) स्तनेषु,

भीताः(श्) शनैः(फ्) प्रिय दधीमहि कर्कशेषु ।

तेनाटवीमटसि तद् व्यथते न किंस्वित्,

कूर्पादिभिर्भ्रमति धीर्भवदायुषां(न्) नः ॥ 19॥

सुजात+ चरणाम् + बुरुहं(म्), तेना+ टवी+ मटसि

कूर्पादि+ भिर् + भ्रमति, धीर् + भवदा+ युषां(न्)

हे प्रियतमा! तुमचे कमळापेक्षाही कोमल सुंदर चरण आम्ही आमच्या कठोर स्तनावर भीत -भीतच अतिशय हळुवारपणे ठेवीत असतो. पण रात्रीच्या वेळी त्याच चरणांनी तुम्ही घनदाट जंगलामध्ये भटकत आहात. काटे, दगड वगैरे लागून त्यांना पीडा होत नाही काय? आम्हाला तर नुसत्या त्या कल्पनेनेच चक्कर येऊ लागली आहे! कारण आमचे जीवनच तुम्ही आहात.॥ 19॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायां(न्)
दशमस्कन्धे पूर्वार्धे रासक्रीडायां(ङ्) गोपीगीतं(न्) नामैकत्रिं(म्)शोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते।।
ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः।।

